सं.फौ.ख.क्र. ३८६/२०२४
सरकार –वि– रूधीर,
नि.क्र.०७ खाली

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव — सागर खुशाल गायधने
वय. २३ वर्षे, व्यवसाय — पेंटिंग ,
राहणार – गांधी वार्ड, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील.</u>**

पोलिसांनी माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. प्रस्तुत प्रकरणा संबंधी मला काही माहिती नाही. आता मला सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सह्या आहेत. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सह्यांना ओळखीसाठी **निशाणी ९ ते ११** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०२.२०२४ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र देवुन घटनास्थळी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलिसांनी बोस नगर तुमसर येथे आरोपीच्या राहत्या घरी पंचनाम्याच्या कार्यवाहीसाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलिसांनी माझेसमक्ष छापा घातला असता आरोपीच्या ताब्यातुन १) एका पांढ–या रंगाच्या कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहीलेली सट्टापट्टी, २) एक पांढ–या रंगाच्या कागदावर मधुर मटक्याचे आकडे लिहीलेची चिठ्ठी ३) एक निळ्या शाईचा डॉट पेन ४) एक कार्बनचा तुकडा व नगदी रक्कम रूपये १२३०/– जप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी ज्यावेळी कार्यवाही केली त्यावेळी आरोपी हजर होता. मी आरोपी क्र. १ ला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही कागदावर सही करण्याअगोदर मी तो वाचुन पाहत असतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी लिहीलेल्या कागदावर सह्या करण्याअगोदर मी त्यातील मजकुर वाचुन पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपीला शिक्षा होवु नये म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वासनिक यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर.पी. बाठे) | (आर.पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २३.०९.२०२५ | दि. २३.०९.२०२५ |